INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF
HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# इगतपुरी तालुक्यातील प्रगतीच्या वाटेवरील ठाकूर जमातीतील आदिवासी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास

**श्रीमती मोनाली नंदकिशोर देशमुख**
संशोधिका
इंदिरानगर, नाशिक

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/10.2021-63842273/IRJHIS2110004

**प्रस्तावना :**

औद्योगीकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची साधने, प्रचार-प्रसार माध्यमे, शिक्षणाचा प्रसार इ. अनेक कारणांमुळे ५० वर्षांच्या काळात आदिवासींचा महाराष्ट्रातील जनतेशी बराच जवळचा संबंध आला आहे. त्यामुळे आदिवासींची इतरांशी विचारांची देवाण घेवाण होवू लागली. आजपर्यंत सेवाकार्यासाठी कार्यकर्त्यांनी केलेले कार्य व शासनाने दिलेल्या सहकार्याचा हात यामुळे आदिवासी समाजात सामाजिक परिवर्तनाचे नवे दालन खुले झाले. अन्याय जुलूम, जबरदस्ती यांपासून दूर ठेवण्याऐवजी अन्यायाला प्रतिकार करण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण होवू लागली. सेठ, सावकरांना, अधिकाऱ्यांना बिचकावणाऱ्या आदिवासींचा बुजरेपणा, भेकडपणा गेल्या ५० वर्षात बराच कमी झाला आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींमध्ये होत असलेले हे परिवर्तन वा सामाजिक बदल सर्व ठिकाणी तसेच सर्व कोकणा, ठाकूर, राजगोंड, आणि भिल्ल या जमातीतील बदल झपाट्याने होत असल्याचे दिसते. तर माडिया, कोरकू, लाम, कातकरी व वारली या जमाती कमी अधिक प्रमाणात आपले पारंपारिक जीवन जगत आहेत. आदिवासींच्या सामाजिक बदलांचे समालोचन करणे तसे कठीण आहे. परिवर्तनाच्या मुळाशी अससेली एक गोष्ठ मात्र निर्विवाद मान्य केली पाहिजे ती म्हणजे ज्या जमाती शेतमालक आहेत ज्यांच्यात बाह्य समाजाशी संघर्ष करण्याचे धारिष्ट्ये व मानिसक कुवत निर्माण झाली आहे व जिथे सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांनी जागृती निर्माण केली आहे त्या जमातीत सामाजिक आणि आर्थिक बदल शिघ्रगतीने होवू लागले आहेत. त्यांच्यात विकासाची प्रवृत्ती वाढत आहे. शिक्षणाची गोडीही वाढत आहे.

इगतपुरी तालुक्यातील ठाकूर आदिवासी जमातीत सुध्दा विकासाची वरील लक्षणे सुद्धा हळूहळू दिसू लागली आहेत. आजपर्यंत विकासासाठी झालेला खर्च मुख्यत्वे वैयक्तिक स्वरुपाच्या योजना व

यंत्रणेवर झाल्यामुळे समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक विकासाची गतीमंद आहे. सावकारी नियंत्रण कायद्याने या आदिवासी भागात थोडाफार उपयोग झालेला आहे.

**संशोधनाची गरज :**

ठाकूर जमातीतील आदिवासींच्या दैनंदिन जीवनमानातही आता खूप फरक पडू लागला आहे. त्यांच्या पारंपारिक जीवनात आता खूप बदल झाल्याचे आढळून येतात. त्याला अनेक बाबी कारणीभूत आहेत. उदा. पाणीपुरवठा, सहकार, शेती, पंचायतराज, आश्रमशाळा, शैक्षणिक संस्था, दळवळणाची साधने, नव्याने निर्माण झालेले उद्योग, नागरीकरण इ. हे बदल मुख्यत: अन्न वेषभूशाविषयी त्यांच्या सवयी, रुढी, नितीमुल्ये, विवाह विषयक कल्पना, धार्मिक विधी, अंधश्रद्धा, आरोग्य विषयक सवयी इ. बाबतीत निश्चीतपणे घडून येताना दिसत आहेत.

वरील बदल घडून येताना कोण कोणती कारणे/बाबी आहेत याचा शोध घेण्यासाठी संशोधकाने इगतपुरी तालुक्यातील ३० गावातील पाच कुटूंबाचा सहेतूक नमूना निवड पद्धतीने अभ्यास केला आहे.

**उद्दीष्ट्ये :**

१) ठाकूर जमातीतील आदिवासी मधील सामाजिक नियंत्रण पद्धतीचा ऱ्हास अभ्यासणे.

२) ठाकूर आदिवासी जमातीमधील बदलत्या प्रतिष्ठा मुल्यांचा अभ्यास करणे.

३) ठाकूर आदिवासी जमातीमधील नितीमुल्यात झालेला बदल अभ्यासणे.

४) ठाकूर आदिवासी जमातीमधील सामाजिक सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करणे.

५) ठाकूर आदिवासी जमातीमधील शैक्षणिक बदलांचा अभ्यास करणे.

**गृहीतके :**

१) ठाकूर आदिवासी सामाजावर इतर बाह्य घटकांचा, समाजाचा प्रभाव पडत आहे.

२) ठाकूर आदिवासी सामाजावर शासकीय योजना, धेय-धोरणे यांचाही परिणाम दिसून येत आहे.

३) ठाकूर आदिवासी जमातीचा जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल दिसून येत आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत विषयावर तथ्य संकलन करण्यासाठी संशोधकाने प्राथमिक व दुय्यम तथ्यांचा आधार घेतला आहे. अभ्यास क्षेत्रातील तीस कुटूंबाची निवड सहा गावातून करुन असंरचित मुलाखतीद्वारा माहीतीचे संकलन केले आहे. शिवाय निगडीत ग्रंथ पुस्तके, मासिके व विशेषांकाच्या आधारे तथ्य संकलन केले आहे. वर्णनात्मक संशोधन आराखड्याच्या सहाय्याने तथ्यांचे विश्लेषण व अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

**नमूना निवड :**

इगतपुरी तालुक्यातील `ठाकूर` आदिवासी वास्तव्य करत अससेल्या सहा गावे वापाड्यातून प्रत्येकी

पाच आदिवासी कुटूंबे अशी एकूण तीस कुटूंबाची सहेतूक नमूना निवड पद्धतीने नमूना निश्चीत केला आहे.

**विश्लेषण :**

प्रस्तूत संशोधन करताना संशोधकास समाजशास्त्रीय दृष्ट्या पुढील बदल प्रकर्षाने दिसून आले.

**१) सामाजिक नियंत्रण पद्धतीचा ऱ्हास :**

आदिवासी समाजातील सामाजिक नियंत्रण ठेवणारी पारंपारिक पद्धती आता बहूतांशी निकामी झाली आहे. प्रत्येक जमातीत पूर्वी त्यांची स्वतंत्र जमात पंचायत होती. या पंचायतीद्वारे जमातीतील वाद, भांडणे, मिटवण्यासाठी गुन्हेगार व्यक्तिंना शिक्षा देण्यासाठी उपयोग होई. त्यांच्यात शिक्षेचे व गुन्ह्याचे स्वरुप साधारण असेच असे. परंतु सध्याची नियंत्रण पद्धती पारंपारिक पद्धतीच्या अगदी विरोधी ठरली. सध्याच्या निवडणूकाच्या पद्धतीत गाव, तालूका, जिल्हा पातळीवर विशेष महत्व प्राप्त झाल्याने नेता निवडण्याची पारंपारिक पद्धती मागे पडली आहे. व्यक्तिला स्वातंत्र मिळाले आहे.

**२) बदलती प्रतिष्ठा मुल्ये :**

अनूसुचित जमातीतील प्रतिष्ठा मुल्ये ही बऱ्याच प्रमाणात बदलत आहेत. याला ठाकूर आदिवासी जमातीतही अपवाद नाही. जमीन जुमला, जनावरे, वय व दैवीशक्तिवरील नियंत्रण या गोष्टीमुळे पूर्वी आदिवासी जमातीमध्ये व्यक्तीस प्रतिष्ठा प्राप्त होत असे. या मुल्यांचे महत्व ठाकूर आदिवासी जमातीमध्ये हळूहळू कमी होत चालले आहे. व त्याची जागा शिक्षण, समाज सेवा, राजकीय नेतृत्व इ. मुल्ये घेत आहेत. ठाकूर जमातीतील आदिवासी पाड्यावरील सामूहिक व सहकार्य भावना कमी होत चालल्या आहेत. कामाचा मोबदला पैशाच्या रुपाने घेतला जावू लागला आहे.

**३) निती मुल्यात बदल :**

ठाकूर आदिवासी जमातीतील निती मुल्येही बदलत चालली आहेत. पण त्या बदलांचा वेग मात्र कमी आहे. पारंपारिक पद्धती, धार्मिक मुल्ये व भगत, भुतावळी सारख्या गोष्टींना अजूनही महत्व देण्यात येत आहे. स्त्री-पुरूष संबंधाविषयी पारंपारिक नितीमुल्यांना मात्र निच्छीतपणे धक्का बसला आहे. तरुण मुला-मुलींमधील विवाहपूर्व शारिरीक संबंध पूर्वी काही बाबतीत सहन केले जात होते. पण आता ते सहन केले जात नाही.

**४) सामाजिक व सांस्कृतिक बदल :**

ठाकूर जमातीतील आदिवासींचे पारंपारिक सामाजिक स्थान खूपच दुय्यम व कनिष्ठ होते. पूर्वी अन्य समाज आदिवासींच्या हाताने अन्न स्विकारत नसत. ज्याप्रमाणे अस्पृश्यांना वागणूक दिली जात असे त्याप्रमाणे आदिवासिंना वागणूक दिली जात असे. परंतू इगतपुरीतील ठाकूर आदिवासी जमात बाह्य समाजाच्या जवळ आला असल्या कारणाने खूपच बदल घडून आलेला आहे. आदिवासीमध्ये

देखील श्रेष्ठ-कनिष्ठपणा आढळून येत असे. त्यांचात रोटी-बेटी व्यवहार प्रचलीत नव्हता. आज सुध्दा फारसे परिवर्तन झाल्याचे दिसून येत नाही. मात्र रोटी व्यवहार सुरु झालेला आहे. आदिवासी बाह्य संपर्कामुळे पूर्वी इतके भित्रे, मवाळ व आगतिक राहिलेले नाही. ठाकूर आदिवासी जमातील लोकांनी हिंदू संस्कृतीचा स्विकार करुन त्यांची देव-देवता, कथा, नृत्य, यांवर हिंदू संस्कृतीचा प्रभाव पडला आहे. त्यामुळे आदिवासींची गाणी, कथा, लोककथा इ. लोप पावू लागल्या आहेत. थोडक्यात आदिवासींच्या पारंपारिक जीवनाचे महत्व निश्चितपणे बदलल आहे. हिंदू संस्कृतिचे अनूकरण आदिवासी करु लागले असले तरी त्यांच्या पारंपारिक जीवनातील साधेपणा, स्वभावातील भोळेपणा, प्रामाणिकपणा, पापभिरुवृत्ती, अबोलपणा इ. गुण त्यांच्यात अजूनही प्रकर्षाने जाणवतात.

५) **शैक्षणिक बदल :**

ठाकूर आदिवासी जमातीत कुटूंब आणि युवागृहाच्या माध्यमातून अनौपचारिक पद्धतीने शिक्षण देण्यात येत आहे आज आदिवासी क्षेत्रात शाळा, महाविद्यालये, वसतीगृहे, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरु झाल्यामुळे शयनगृहाचा ऱ्हास झाला असून औपतारिक शिक्षणाला प्राधान्य दिले जात आहे. आदिवासी शिक्षणाचे प्रमाण वाढलेत्यामुळे डॉक्टर इंजिनीअर, वकील, प्राध्यापक, शिक्षक व इतर प्रशासकीय खात्यात जिल्हाधिकारी पदापासून खालच्या स्तरापर्यंत अनेक आदिवासी लोक नोकरी करतांना दिसून येतात.

**निष्कर्ष :**

पारंपारिक आदिवासी हे पुर्वीचे आदिवासी न राहता बाह्य जगाच्या व समाजाच्या संपर्कामुळे त्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत महत्वपूर्ण बदल झाल्याचे दिसून येतआहेत. परंतू काही आदिवासी जमाती भारतासारख्या देशात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुद्धा दऱ्या खोऱ्यात, जंगलात, दूर्गम भागात वास्तव्य करतांना दिसत आहेत. अजूनही त्यांच्या पर्यंत विकासाची गंगा पोहचली नाही याचे महत्वाचे कारण म्हणजे भारत सरकार यांची कायदे व प्रशासकीय यंत्रणेच्या प्रामाणिकपणाचा अभाव व अंमलबजावणीतील उणीवा होय.

**संदर्भ ग्रंथ :**

१) लोकराज्य, आदिवासी विकास विशेषांक, १६ डिसे १९८३.

२) डॉ. गारे गोविंद, आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद १९९४.

३) योजना सप्टेंबर २००८

४) डॉ. खडसे भा. कि. भारतीय समाज, हिमालय, पब्लिशिंग हाउस, मुंबई.

५) डॉ. साळुंखे संजय, भारतीय गोंड, संवेदना प्रकाशन, औरंगाबाद २००२